# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 14 February 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अमेरिका दौरा महत्त्वपूर्ण आणि अतिशय फलदायी ठरला असल्याचं, परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव विक्रम मिस्त्री यांनी म्हटलं आहे. पंतप्रधानांच्या दौऱ्यासंदर्भात आज पत्रकार परिषदेत त्यांनी माहिती दिली. पंतप्रधान मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात संरक्षण सहकार्य, संरक्षण करार, आर्थिक संबंध, तंत्रज्ञान, उर्जा संरक्षण, नागरी संबंध आणि जागतिक समस्यांवर चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं. २०३५ पर्यंतच्या अमेरिका भारत प्रमुख संरक्षण भागीदारीसाठी १० वर्षांच्या नवीन आराखड्याला अंतिम रूप देण्याची योजना यावेळी जाहीर करण्यात आली, तसंच दोन्ही देशांमध्ये निर्यातीमधले अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं निश्चित करण्यात आल्याचं, मिस्त्री यांनी सांगितलं.

****

दरम्यान, थायलंडमध्ये आयोजित संवाद या चौथ्या जागतिक हिंदू बुद्धिस्ट उपक्रम कार्यक्रमात पंतप्रधानांनी दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून संबोधित केलं. भगवान बुद्धांची शिकवण जगाला शांततापूर्ण, प्रगतीशील युगाच्या निर्मितीसाठी मार्गदर्शक असल्याचं, ते यावेळी म्हणाले. भारत आणि थायलंड या देशांनी अनेक क्षेत्रांमध्ये एक सशक्त भागीदारी केली आहे, असं सांगत ही परिषद भारत आणि थायलंडमधल्या मैत्रीचा आणखी एक यशस्वी अध्याय असल्याचं, पंतप्रधान म्हणाले. जागतिक उत्तरदायित्व आणि परस्पर सहकार्यावर आधारित स्थैर्याचं तसंच पर्यावरणाचा समतोल राखण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

****

जम्मू काश्मीरमधल्या पुलवामा दहशतवादी हल्ल्याला आज सहा वर्ष पूर्ण झाली. या हल्ल्यात केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या ४० सैनिकांना वीरमरण आलं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या हल्ल्यातल्या हुतातम्यांना आदरांजली अर्पण केली आहे. या जवानांचं बलिदान आणि राष्ट्राप्रती असलेलं त्यांचं अतूट समर्पण येणाऱ्या पिढ्या कधीही विसरणार नाहीत, असं त्यांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.
केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही हुतात्मा सैनिकांना आदरांजली वाहीली आहे. दहशतवाद हा समाजाचा सर्वात मोठा शत्रू असून, संपूर्ण जग त्याविरुद्ध एकजूट असल्याचं, शहा यांनी नमूद केलं.

****

परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमाच्या आजच्या भागात पोषणतज्ञ ऋजुता दिवेकर, फूडफार्मर रेवंत हिमत्सिंगका आणि पोषणतज्ञ शोनाली सबरवाल यांनी विद्यार्थ्यांना आहाराचं महत्व अधोरेखित केलं. परीक्षेदरम्यान शरीरात अधिक ऊर्जा आणि, एकाग्रता राखणं तसंच मानसिक शांतता राखण्यासाठी संतुलित आहार आणि निरोगी जीवनशैली पाळण्यासाठी त्यांनी प्रभावी सूचना दिल्या. विद्यार्थ्यांच्या जीवनात अभ्यासातल्या विविधतेप्रमाणेच अन्नामध्येही विविधता असावी, बाहेरचं अन्न टाळून घरातल्या जेवणाला प्राधान्य द्यावं, असा सल्ला ऋजुता दिवेकर यांनी दिला.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेनं मुंबईतल्या न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेवर मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्यानं निर्बंध घातले आहेत. आरबीआयनं निर्बंध घातल्यानं बँकेत ठेवी ठेवणाऱ्या खातेदारांना त्यांची रक्कम काढता येणार नाही, बँक आता कर्ज देऊ शकणार नाही किंवा ठेवी देखील स्वीकारु शकणार नाही. पुढील सहा महिन्यांसाठी हे निर्बंध लागू असतील.

****

महाविद्यालयीन जीवनात आभासी विश्वातून येणाऱ्या प्रलोभनांपासून विद्यार्थ्यांनी सावध रहाव, असं आवाहन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी केलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथल्या देवगिरी महाविद्यालयात राज्य महिला आयोगाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी 'सायबर गुन्हेगारीचा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम' या विषयावरच्या व्याख्यानात त्या आज बोलत होत्या. आपण फसवले जातोय असं वाटताच सायबर पोलिसांची, महाविद्यालयाची आणि आपल्या पालकांची मदत घ्या, असं देखील चाकणकर म्हणाल्या.

****

मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीनं दिला जाणारा कवयित्री लीला धनपलवार विशेष काव्य पुरस्कार, नांदेडचे कवी पी. विठ्ठल यांना जाहीर झाला आहे. परिषदेचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील यांनी एका पत्रकाद्वारे ही माहिती दिली. रोख ११ हजार रुपये, सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

****

आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत गरजूंना, पाच लाख रुपयांपर्यंतचे वैद्यकीय उपचार आणि शस्त्रक्रियेसाठी कार्ड काढण्याकरता तसंच नावाची नोंदणी करण्याकरता हिंगोली नगर परिषदेच्या वतीने विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. हिंगोली शहरात पाच ठिकाणी शिबीरं आयोजित करण्यात आले असल्याची माहिती, नगरपरिषद मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांनी दिली.

****

उत्तराखंड मध्ये सुरु असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे. पुढच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचं आयोजन मेघालय करणार असून, यावेळी खेळांचा ध्वज मेघालयला सुपूर्द केला जाईल.

दरम्यान, या स्पर्धेत महाराष्ट्रानं पदकांचा २०० चा आकडा पार केला आहे. राज्याच्या खात्यात एकूण सर्वाधिक २०१ पदकं असून, त्यामध्ये ५४ सुवर्ण, ७१ रौप्य आणि ७६ कांस्य पदकांचा समावेश आहे. सर्वाधिक ६८ सुवर्ण पदक जिंकून सेना दल पहिल्या, ५४ सुवर्णांसह महाराष्ट्र दुसऱ्या, तर ४८ सुवर्ण पदकांसह हरियाणा तिसऱ्या क्रमांकावर आहे.

****